डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय
जिल्हा परिषद, अमरावती

OFFICE OF THE ZILLA PARISHAD AMRAVATI.

पेपर - 3

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४

(दिनांक ३१ डिसेंबर १९८८ पर्यंत सुधारल्याप्रमाणे)

पुनर्मुद्रण १९९१

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रसिद्ध केले.

१९९१

[ किंमत रु. ३.०० ]

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७

ZILLA PARISHAD AMRAVATI

## शासकीय अधिसूचना, सहकार व ग्रामविकास विभाग, क्रमांक डीएसआर. १५६३-पाच दिनांक ८ जून १९६७

[ महाराष्ट्र राजपत्र (इंग्रजी) भाग चार-ब, पृ. १६५९ ]

शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक डीएसआर. १५६८/पाच, दिनांक ६ जून १९६९ द्वारे सुधारित (महाराष्ट्र राजपत्र, भाग चार-ब, पृष्ठ ७५४).

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ महा. पाच) याचे कलम २७४, पोट-कलम (२) च्या खंड (सदतीस) व (एकोणचाळीस) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे, उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत:—

१. **संक्षिप्त नाव, प्रयुक्ती व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ असे म्हणावे.

(२) ते सर्व परिषद कर्मचाऱ्यांना लागू होतील.

(३) नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हे नियम, ते ज्या दिनांकाला शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील त्या दिनांकापासून अंमलात येतील व इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ते दिनांक १ मे १९६२ पासून अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

२. **व्याख्या.**—या नियमात, संदर्भावरून अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(अ) "अधिनियम" म्हणजे, "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१".

(ब) "नेमून दिलेला कर्मचारी" म्हणजे, कलम २४५ च्या तरतुदी अंमलात आल्यामुळे जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी झाला असेल असा एखादा परिषद कर्मचारी किंवा *[या अधिनियमाच्या कलम २४२ अन्वये जो अंतिमत: एखाद्या जिल्हा सेवेकडे नेमून दिला असेल असा] राज्य शासनाच्या सेवांतील कोणताही कर्मचारी.

(क) "जिल्हा सेवा" म्हणजे, या अधिनियमाच्या कलम २३९ च्या खंड (ब) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा सेवांपैकी कोणतीही जिल्हा सेवा.

(ड) परिषद कर्मचाऱ्याच्या संबंधात "कुटुंबातील सदस्य" या शब्दप्रयोगात पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

(एक) अशा परिषद कर्मचाऱ्याची पत्नी, मूल किंवा सावत्र मूल—मग ती त्याच्यासमवेत राहात असोत वा नसोत, आणि स्त्री परिषद कर्मचाऱ्याच्या बाबतीत, तिच्यासमवेत राहणारा व तिच्यावर अवलंबून असणारा पती; आणि

(दोन) परिषद कर्मचाऱ्याशी किंवा अशा परिषद कर्मचाऱ्याच्या पत्नीशी किंवा पतीशी रक्ताचे नाते किंवा लग्नबंधनामुळे नाते असलेली व अशा परिषद कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असलेली अन्य कोणतीही व्यक्ती :

परंतु यामध्ये, परिषद कर्मचाऱ्यापासून कायद्याने विभक्त झालेल्या पत्नी किंवा पती किंवा कोणत्याही प्रकारे परिषद कर्मचाऱ्यावर अवलंबून नसलेले किंवा योग्य विधी प्रक्रियेमुळे परिषद कर्मचारी, ज्याच्या अभिरक्षेस मुकला असेल असे मूल किंवा सावत्र मूल यांचा समावेश होणार नाही.

---

* शासकीय अधिसूचना, दिनांक ६ जून १९६९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

म्हीए ४९३३—१

(६) "परिषद कर्मचारी" म्हणजे कोणत्याही जिल्हा सेवेत कोणत्याही पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती व यामध्ये भारतातील कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा त्यास दुय्यम असणाऱ्या एखाद्या प्राधिकरणाच्या किंवा एखाद्या स्थानिक वा अन्य प्राधिकरणाच्या सेवेतील ज्या व्यक्तीच्या सेवा जिल्हा सेवेकरिता एखाद्या जिल्हा परिषदेकडे तात्पुरत्या सोपविण्यात आल्या असतील अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

**३. परिषद कर्मचाऱ्यांचे सचोटी पालनाचे कर्तव्य.**---प्रत्येक परिषद कर्मचारी, सदैव निरपवाद सचोटीने वागेल व कर्तव्यपरायण असेल.

**४. राजकारण व निवडणुका यामध्ये सहभाग.**---(१) कोणताही परिषद कर्मचारी, कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा जी सामान्यत: राजकारणात भाग घेते अशा कोणत्याही संघटनेचा सदस्य असणार नाही किंवा त्याच्याशी अन्यथा संबंधित असणार नाही. किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात भाग घेणार नाही. त्यासाठी वर्गणी देणार नाही किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने त्यास सहाय्य करणार नाही.

(२) आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला, भारतात विधिद्वारे संस्थापित अशा कोणत्याही शासनाला, विघातक असलेल्या किंवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विघातक असलेल्या कोणत्याही चळवळीत, किंवा कार्यात भाग घेण्यास, त्यासाठी मदत करण्यात किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने त्यास सहाय्य करण्यास प्रतिबंध करण्याकरिता प्रयत्नांची शिकस्त करणे, हे प्रत्येक परिषद कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असेल आणि अशा प्रयत्नास परिषद कर्मचारी अयशस्वी ठरेल त्याबाबतीत तो मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास याप्रमाणे कळवील.

(३) कोणतीही चळवळ किंवा कार्य या नियमाच्या अर्थकक्षेत येते किंवा कसे याबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(४) कोणताही परिषद कर्मचारी, कोणत्याही विधान मंडळाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत (या नियमात यापुढे ज्याचा निर्देश "निवडणूक" असा करण्यात आला आहे) प्रचार करणार नाही, किंवा अन्यथा त्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही किंवा त्यासंबंधी स्वत:चे वजन खर्ची घालणार नाही :

परंतु अशा निवडणुकीत मत देण्यास अर्ह असणाऱ्या परिषद कर्मचाऱ्यास मत देण्याच्या आपल्या अधिकाराचा वापर करता येईल आणि तो तसे करील त्याबाबतीत, तो कोणत्या तऱ्हेने मतदान करणार आहे किंवा त्याने मतदान केले आहे, याबद्दल संपूर्ण गुप्तता राखील.

**स्पष्टीकरण.**---(१) एखादा परिषद कर्मचारी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिद्वारे किंवा तदन्वये किंवा शासनाच्या वा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे त्याच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्याचे योग्य ते पालन करताना एखाद्या निवडणुकीच्या कामकाजात मदत करील त्याबाबतीत, त्याने या नियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) परिषद कर्मचाऱ्याने स्वत:च्या अंगावर, वाहनावर किंवा निवासस्थानावर कोणत्याही निवडणूक चिन्हाचे प्रदर्शन करणे हे निवडणुकीच्या बाबतीत त्याने स्वत:चे वजन खर्ची घातल्यासारखे होईल व निवडणुकीतील उमेदवाराचे नांव त्याने सुचविणे किंवा त्यास अनुमोदन देणे हे, या नियमाच्या अर्थानुसार, निवडणुकीत भाग घेतल्याचे ठरेल आणि तदनुसार, अशा कोणत्याही प्रसंगी, परिषद कर्मचाऱ्याने या नियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येईल.

**५. निदर्शने व संप.**---कोणताही परिषद कर्मचारी, (एक) भारताच्या सार्वभौमत्वाच्या किंवा एकात्मतेच्या हिताला, राज्याच्या सुरक्षिततेला, परकीय राज्यांशी असलेल्या मित्रत्वाच्या संबंधांना, सार्वजनिक सुव्यवस्थेला, सभ्यतेला व नीतीमत्तेला बाधक ठरेल किंवा ज्यामुळे न्यायालयाचा अवमान किंवा बदनामी होईल किंवा एखादा अपराध करण्यास चिथावणी मिळेल असे कोणतेही निदर्शन करणार नाही किंवा त्यात सहभागी होणार नाही; किंवा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय
जिल्हा परिषद अमरावती

THE ZILLA PARISHAD AMRAVATI



(दोन) स्वतःच्या सेवेसंबंधातील किंवा इतर कोणत्याही परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवेसंबंधातील कोणत्याही बाबीसंबंधात कोणत्याही स्वरूपाचा संप करणार नाही किंवा कोणत्याही स्वरूपाच्या संपास कोणत्याही प्रकारे प्रोत्साहन देणार नाही.

६. **परिषद कर्मचारी ज्यांना निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणाव्यतिरिक्त अन्य प्राधिकरणाशी संपर्क साधण्यास बंदी.**---(१) कोणताही परिषद कर्मचारी, त्याच्या कार्यालयीन कर्तव्याच्या संबंधात किंवा जिल्हा परिषदेचा कर्मचारी या नात्याने त्याच्यावर व्यक्तिशः परिणाम होईल असा कोणत्याही बाबीसंबंधात तो ज्याला निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणाखेरीज अन्य कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणाशी कोणताही थेट पत्रव्यवहार करणार नाही :

परंतु, परिषद कर्मचारी ज्याला निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणामार्फत कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणास उद्देशून पत्रव्यवहार करण्यात आला असेल त्याबाबतीत, तो असा पत्रव्यवहार ज्याला उद्देशून असेल अशा प्राधिकरणाकडे अशा पत्रव्यवहाराची एक प्रत पाठवू शकेल.

(२) कोणताही परिषद कर्मचारी, जिल्हा परिषदेचा कर्मचारी या नात्याने त्याच्यावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही बाबींच्या संबंधात, पाठिंबा मिळविण्याच्या हेतूने, तो ज्याला निकट दुय्यम असेल अशा अधिकाऱ्याखेरीज अन्य कोणत्याही (अधिकृत किंवा अनधिकृत) व्यक्तीला भेटणार नाही.

(३) कोणताही परिषद कर्मचारी,---

(अ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीखेरीज कोणत्याही मंत्र्यांची किंवा शासन सचिवांची;

(ब) तो ज्याला निकट दुय्यम असेल त्या प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीखेरीज अन्य कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणाची भेट घेण्याचा प्रयत्न करणार नाही.

(४) परिषद कर्मचारी, नियुक्तीसाठी किंवा पदोन्नतीसाठी केलेला प्रत्येक अर्ज, विभागीय आदेशामध्ये ठरवून देण्यात येईल अशा एका किंवा अनेक प्राधिकरणांमार्फत सादर करील.

(५) कोणताही परिषद कर्मचारी, त्याच्या सेवेच्या शर्ती व अटी यांच्याशी संबंधित, संबंधित असेल अशा कोणत्याही बाबतीत कोणत्याही अधिकृत वा अनधिकृत व्यक्तीवर मग तो जिल्हा परिषदेशी संबंधित असो वा नसो, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या वजन पाडणार नाही.

७. **माहिती इत्यादी अनधिकृत रीत्या पुरविण्यास बंदी.**---मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्याबाबतीत सर्वसाधारणतः किंवा विशेषतः प्राधिकृत केले असल्याखेरीज, कोणताही परिषद कर्मचारी, इतर विभागात काम करणाऱ्या कोणत्याही परिषद कर्मचाऱ्याला किंवा जिला कळविण्याबाबत त्यास प्राधिकृत करण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला,---

(अ) त्याला जी कळली असेल किंवा त्याला नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडीत असताना कोणत्याही साधनापासुन त्याने मिळविलेली कोणतीही माहिती; किंवा

(ब) त्याने तयार केला असेल किंवा तो ती कर्तव्ये पार पाडीत असताना कोणत्याही साधनापासून त्याच्या कब्जात आला असेल अशा दस्तऐवजातील कोणताही मजकूर कळविणार नाही.

८. **वृत्तपत्रे किंवा आकाशवाणी यांच्याशी संबंध ठेवण्यास बंदी.**---(१) कोणताही परिषद कर्मचारी कोणतेही वृत्तपत्र किंवा इतर नियतकालिक यांचा पूर्णतः किंवा अंशतः मालक असणार नाही किंवा त्यांचे संकलन किंवा व्यवस्थापन यात सहभागी होणार नाही :

परंतु, मुख्य कार्यकारी अधिकारी, ज्यामध्ये केवळ राजकीयेतर स्वरूपाच्या बाबी असतील अशा कोणत्याही वृत्तपत्राची किंवा नियतकालिकाची मालकी धारण करण्यास किंवा ते चालविण्यास किंवा त्याचे संपादन किंवा व्यवस्थापन यात सहभागी होण्यास कोणत्याही परिषद कर्मचाऱ्यास परवानगी देऊ शकेल. आणि अशी परवानगी का काढून घेऊ नये याबद्दलचे कारण दर्शविण्याची त्यास संधी दिल्यानंतर अशी परवानगी काढून घेता येईल.

(२) कोणताही परिषद कर्मचारी आकाशवाणीच्या कोणत्याही प्रसारणात किंवा निनावी किंवा स्वत:च्या किंवा इतर कोणाही व्यक्तीच्या नावाने प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही लेखात किंवा वृत्तपत्राशी केलेल्या कोणत्याही पत्रव्यवहारात किंवा कोणत्याही सार्वजनिक भाषणात किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी,—

(अ) ज्यामध्ये भारतातील कोणत्याही शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही, चालू किंवा अलिकडील धोरणावर किंवा कृतीवर प्रतिकूल टीका होण्याएवढा प्रभाव असेल; किंवा

(ब) ज्यामुळे भारतातील कोणतेही शासन व जिल्हा परिषद यांच्यातील संबंध अडचणीत येण्याची शक्यता असेल; किंवा

(क) ज्यामुळे भारतातील शासन व कोणत्याही परकीय राज्याचे शासन यांच्यातील संबंधात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असेल;

असे वस्तुस्थितीदर्शक कोणतेही निवेदन करणार नाही किंवा असे कोणतेही मतप्रदर्शन करणार नाही :

परंतु, परिषद कर्मचाऱ्याने, अधिकारी या नात्याने किंवा त्याला नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या कोणत्याही निवेदनांना किंवा व्यक्त केलेल्या कोणत्याही मताला या पोट-नियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

९. **समिती किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणापुढे साक्ष देणे.**—(१) पोट-नियम (३) मध्ये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज, कोणताही परिषद कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीने, समितीने किंवा प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही चौकशी संबंधात साक्ष देणार नाही.

(२) मुख्य कार्यकारी, अधिकाऱ्याच्या मंजुरीने साक्ष देताना कोणताही परिषद कर्मचारी भारतातील कोणत्याही शासनाच्या किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेच्या धोरणावर किंवा त्यांच्या कोणत्याही कृतीवर टीका करणार नाही.

(३) या नियमातील कोणतीही गोष्ट परिषद कर्मचाऱ्याने,—

(अ) जिल्हा परिषदेने, भारतातील कोणत्याही शासनाने, संसदेने किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाने नियुक्त केलेल्या प्राधिकरणासमोरील चौकशीत; किंवा

(ब) न्यायिक चौकशी; किंवा

(क) जिल्हा परिषदेच्या कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने आदेश दिल्याप्रमाणे करण्यात आलेल्या विभागीय चौकशीत, दिलेल्या साक्षीस लागू होणार नाही.

१०. **वर्गणी.**—कोणताही परिषद कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज कोणत्याही उद्देश पूर्तीस्तव निधी उभारण्यासाठी वर्गणीची मागणी करणार नाही किंवा ती स्वीकारणार नाही किंवा अन्य रीतीने उक्त प्रयोजनात सहभागी होणार नाही.

११. **देणग्या.**—(१) नियम १३ च्या तरतुदींस अधीन राहून परिषद कर्मचारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज कोणत्याही व्यक्तीकडून क्षुल्लक मूल्यापेक्षा अधिक मूल्याची कोणतीही भेट स्वीकारणार नाही किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास तिचा स्वीकार करण्याची परवानगी देणार नाही :

परंतु अशा भेटी देणे किंवा घेणे हे प्रचलीत, धार्मिक किंवा सामाजिक रूढीला अनुसरून असेल तेव्हा विवाह, वाढदिवस, अंत्यविधी किंवा धार्मिक समारंभ यासारख्या प्रसंगी, नातेवाईक व वैयक्तिक मित्र यांच्याकडून उपरोक्त प्रसंगात सर्वथैव वाजवी असतील अशा मूल्यांच्या भेटवस्तू स्वीकारता येतील किंवा अशा प्रसंगी अशा व्यक्तींना अशा भेटवस्तू देता येतील. परंतु (क्षुल्लक मूल्याच्या भेटींव्यतिरिक्त) अशा भेटी स्वीकारण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास कळविण्यात येईल व मुख्य कार्यकारी अधिकारी निदेश देईल अशा रीतीने अशा भेटवस्तूंची विल्हेवाट लावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**---या पोट-नियमाच्या प्रयोजनासाठी सार्वजनिक इमारतीच्या पायाभरणीचा दगड बसविताना किंवा तिचे उद्घाटन करताना किंवा कोणत्याही समारंभाच्या वेळी परिषद कर्मचाऱ्यास देण्यात आलेली थापी, किल्ली किंवा तत्सम इतर वस्तू ही भेटवस्तू असल्याचे समजण्यात येईल.

(२) कोणतीही भेटवस्तू ही क्षुल्लक किमतीची आहे किंवा कसे असा प्रश्न उद्भवल्यास किंवा आपल्याला देण्यात आलेली एखादी भेटवस्तू क्षुल्लक किमतीची आहे किंवा कसे याबद्दल परिषद कर्मचाऱ्यांच्या मनात कोणतीही शंका असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास तसे कळविण्यात येईल व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.**---एखादी भेटवस्तू क्षुल्लक किमतीची आहे किंवा कसे ही गोष्ट भेट देणारी व्यक्ती कोण आहे यावर आणि ज्या परिस्थितीत ती भेटवस्तू देण्यात आली त्या परिस्थितीवर अवलंबून असेल. परिषद कर्मचाऱ्यांचा नातेवाईक नसेल किंवा त्याचा वैयक्तिक मित्र नसेल अशा व्यक्तीकडून देण्यात आलेली परिषद कर्मचाऱ्यांच्या मासिक उपलब्धीच्या १/२० पेक्षा अधिक किंवा रुपये २० यापैकी जी किंमत कमी असेल एवढ्या किमतीची भेटवस्तू ही सामान्यतः क्षुल्लक किमतीची भेटवस्तू नसल्याचे मानण्यात येईल. पोट-नियम (१) च्या परंतुकात उल्लेखिलेल्या विशेष प्रसंगी नातेवाईक व वैयक्तिक मित्र यांच्याकडून विशेष प्रसंगी मिळालेली, व परिषद कर्मचाऱ्याच्या मासिक उपलब्धीच्या १/८ किंवा रु. ५० यापैकी जी कमी असेल तेवढ्या किमतीची किंवा अशा उपलब्धीच्या निम्म्या किमतीची किंवा रु. २०० या दोहोपैकी जी कमी असेल त्या किमतीची भेटवस्तूसुद्धा क्षुल्लक किमतीची असल्याचे मानण्यात येईल.

**१२. परिषद कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ सार्वजनिक निदर्शने किंवा इतर समारंभ.**--- (१) नियम १३ च्या तरतुदीस अधीन राहून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या किंवा याबाबतीत त्याने अधिकार प्रदान केले असतील अशा अन्य प्राधिकरणाच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज परिषद कर्मचारी,---

(अ) कोणत्याही गौरवपर किंवा निरोपाच्या भाषणाला उपस्थित राहणार नाही किंवा त्याला सादर करण्यात आलेला प्रमाणलेख स्वीकारणार नाही किंवा त्याच्या सन्मानार्थ भरविण्यात आलेल्या कोणत्याही सार्वजनिक सभेला किंवा समारंभाला उपस्थित राहाणार नाही; किंवा

(ब) अन्य कोणत्याही परिषद कर्मचाऱ्यास किंवा जिल्हा परिषदेची सेवा ज्या व्यक्तीने नुकतीच सोडली असेल अशा व्यक्तीस कोणतेही गौरवपर किंवा निरोपाचे मानपत्र देण्याच्या समारंभात सहभागी होणार नाही किंवा अशा परिषद कर्मचाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या सन्मानार्थ भरविण्यात आलेल्या कोणत्याही सभेला किंवा समारंभाला उपस्थित राहाणार नाही :

परंतु, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या तरतुदींस अधीन राहून परिषद कर्मचाऱ्यास स्वतःच्या किंवा अन्य एखाद्या परिषद कर्मचाऱ्याच्या किंवा ज्या व्यक्तीने जिल्हा परिषदेची सेवा नुकतीच सोडली असेल अशा व्यक्तीच्या सन्मानार्थ, सेवेतून निवृत्त होण्याच्या किंवा जिल्ह्यातून किंवा सेवेच्या ठिकाणाहून स्वतः किंवा असा अन्य परिषद कर्मचारी किंवा व्यक्ती बदलून जाणार असल्याच्या प्रसंगी भरविण्यात आलेल्या, मुख्यतः खाजगी व अनौपचारीक स्वरूपाच्या निरोप समारंभास उपस्थित राहाता येईल.

**१३. विवक्षित प्रकरणी नियम ११ व नियम १२ परिषद कर्मचाऱ्यास लागू नसणे.**---नियम ११ किंवा नियम १२ मधील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही परिषद कर्मचाऱ्यास कोणत्याही सार्वजनिक संस्थेच्या विनंतीवरून त्यास भेट देण्याचा हेतू नसेल अशी तसबीर, अर्धपुतळा किंवा इतर पुतळा तयार करण्यासाठी प्रतिमान (मॉडेल) म्हणून बसण्यास प्रतिबंध होणार नाही.

**१४. खाजगी व्यापार किंवा नोकरी.**---(१) कोणताही परिषद कर्मचारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यापार, व्यवसायांत गुंतवणार नाही किंवा कोणतीही नोकरी सुरू करणार नाही. परंतु परिषद कर्मचाऱ्यांस, अशा मंजुरीशिवाय सामाजिक किंवा धर्मादाय स्वरूपाचे एखादे मानसेवी कार्य किंवा साहित्यिक,

कलात्मक किंवा शास्त्रीय स्वरूपाचे प्रासंगिक कार्य, त्यामुळे त्याच्या कार्यालयीन कामास बाध येणार नाही व मुख्य कार्यकारी अधिकारी निदेश देईल तर तो ते काम करण्याचे बंद करील या शर्तीस अधीन राहून करता येईल.

**स्पष्टीकरण.**---परिषद कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या मालकीच्या किंवा त्याच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या विमा एजन्सीच्या किंवा अडत एजन्सीच्या व्यवसायाच्या पुष्टयर्थ परिषद कर्मचाऱ्याने प्रचार करणे हे या पोट-नियमाच्या अर्थांतर्गत तो व्यापार किंवा व्यवसाय करीत असल्याचे मानण्यात येईल.

(२) कोणताही परिषद कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने असेल त्याशिवाय कंपन्याबाबत अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही विधिअन्वये नोंदण्यात आलेल्या कोणत्याही बँकेच्या किंवा कंपनीच्या नोंदणीच्या प्रचालनाच्या, किंवा व्यवस्थापनाच्या कामात भाग घेणार नाही :

परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महाराष्ट्र २४) अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही विधिअन्वये नोंदणी करण्यात आलेल्या किंवा नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या एखाद्या सहकारी संस्थेच्या किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २२) अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही तत्सम विधिअन्वये नोंदण्यात आलेल्या एखाद्या साहित्यिक, शास्त्रीय किंवा धर्मादाय संस्थेच्या नोंदणीच्या, प्रचालनाच्या किंवा व्यवस्थापनाच्या कामात परिषद कर्मचाऱ्यास भाग घेता येईल.

**१५. गुंतवणुका, कर्जे देणे व कर्जे घेणे.**---(१) कोणताही परिषद कर्मचारी, कोणत्याही रकमा गुंतवण्याच्या बाबतीत सट्टा खेळणार नाही.

**स्पष्टीकरण.**---अत्यंत अस्थिर किंमत असलेल्या रोख्यांची सराईतपणे केलेली खरेदी किंवा विक्री ही या पोट-नियमाच्या अर्थान्तर्गत रकमा गुंतवण्याच्या बाबतीतील सट्टेबाजी समजण्यात येईल.

(२) कोणताही परिषद कर्मचारी त्याला त्याचे कार्यालयीन कर्तव्य पार पाडणे अवघड होईल किंवा असे कर्तव्य करताना त्याच्यावर दबाव येण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही गुंतवणुका करणार नाही र किंवा आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला तसे करण्यास परवानगी देणार नाही.

(३) एखादी गुंतवणूक ही, पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(४) कोणताही परिषद कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, त्याच्या प्राधिकाराखालील स्थानिक हद्दीत जमीन किंवा मूल्यवान मालमत्ता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पैसे कर्जाऊ किंवा व्याजाने देणार नाही :

परंतु परिषद कर्मचाऱ्यांस त्याच्या खाजगी नोकराला आगाऊ पगार देता येईल किंवा वैयक्तिक मित्रास किंवा नातेवाईकास अशा व्यक्तीची त्याच्या प्राधिकाराच्या स्थानिक हद्दीमध्ये मालकीची जमीन असली तरीही लहान रक्कम बिनव्याजी कर्जाऊ देता येईल.

(५) कोणताही परिषद कर्मचारी, प्रतिष्ठित बँक किंवा कंपनी (पेढीसह) यांच्याशी नेहमी करावयाच्या व्यवहाराखेरीज त्याच्या प्राधिकाराच्या स्थानिक हद्दीमधील कोणत्याही व्यक्तीकडून किंवा ज्याच्याशी त्याचा अधिकृत व्यवहार व्हावयाचा असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून पैसे उसने घेणार नाही किंवा अन्य कोणत्याहीप्रकारे आर्थिक मिंधेपणा घेणार नाही किंवा आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज असा कोणताही व्यवहार करण्यास परवानगी देणार नाही :

परंतु परिषद कर्मचाऱ्यास वैयक्तिक मित्राकडून किंवा नातेवाईकाकडून केवळ तात्पुरते कर्ज म्हणून बिनव्याजी अल्पशी रक्कम घेता येईल. किंवा एखादया खऱ्याखुऱ्या व्यापाऱ्याकडे उधारीचे खाते चालू ठेवता येईल.

(६) ज्यामुळे पोट-नियम (४) किंवा पोट-नियम (५) च्या तरतुदींच्या भंग होण्याच्या प्रकरणी परिषद कर्मचारी गोवला जाईल अशा पदावर त्याची नियुक्ती किंवा बदली करण्यात येईल तर तो अशी परिस्थिती तातडतोब मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांस कळवील आणि त्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी देईल अशा आदेशानुसार तो कृती करील.

(७) पोट-नियम (४), (५) किंवा (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांस, जिल्हा सेवा (वर्ग चार) मधील परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उक्त नियमांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदी शिथिल करता येतील.

(ब) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदलेल्या किंवा नोंदण्यात आल्याचे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही सहकारी संस्थेला कर्ज देण्याच्या किंवा तिच्याकडून कर्ज घेण्याच्या बाबतीत, उक्त तरतुदी, मुख्य कार्यकारी अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा निर्बंधासह किंवा सवलतींसह लागू होतील असा निदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास देता येईल.

१६. नादारी व सराईत कर्जबाजारीपणा.—(१) परिषद कर्मचाऱ्यांस नादार म्हणून न्याय-निर्णीत किंवा घोषित करण्यात येईल किंवा त्याचे अर्धवेतन सतत जप्त करण्यात येत असेल किंवा दोन वर्षांपेक्षा अधिक मुदतीकरिता ते सतत जप्त होत असेल किंवा ज्या रकमेची सर्वसाधारण परिस्थिती दोन वर्षांच्या मुदतीत फेड करणे शक्य नसेल अशा रकमेसाठी त्यांचे वेतन जप्त करण्यात येत असेल आणि अशा कर्जबाजारीपणामुळे ऋणकोच्या, जिल्हा परिषदेचा कर्मचारी या नात्याने कार्यक्षमतेत मुख्यत: उणीव निर्माण होण्याची शक्यता आहे असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे मत असेल तर तो पदच्युत होण्यास पात्र ठरेल.

(२) या नियमाखालील प्रत्येक प्रकरणात, नादारी व कर्जबाजारीपणा हा परिस्थितीजन्य असून सर्वसाधारण दक्षता घेऊनही परिषद कर्मचाऱ्यास त्या परिस्थितीची कल्पना येणे किंवा तीवर नियंत्रण ठेवणे शक्य नव्हते व अशी नादारी किंवा कर्जबाजारीपणा हा बेसुमार खर्च करण्याच्या किंवा उधळपट्टी करण्याच्या वृत्तीतून निर्माण झालेला नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी परिषद कर्मचाऱ्यावर राहील.

१७. जंगम, स्थावर व मौल्यवान मालमत्ता.—(१) कोणताही परिषद कर्मचारी,—

(अ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज (मंजुरीकरिता केलेल्या अर्जाच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत त्यासाठी मंजुरी देण्यात आली नसेल तर ती दिली असल्याचे गृहित धरण्यात येईल.) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मान्यता दिलेला विक्रेता किंवा अभिकर्ता (एजंट) नसेल अशा कोणत्याही व्यक्तीखेरीज अन्यथा कोणत्याही व्यक्तीमार्फत स्थावर मालमत्तेचे संपादन, विल्हेवाट लावण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल तर, अशा कोणत्याही स्थावर मालमत्तेचे ती पट्ट्याने देऊन गहाण ठेवून तिची खरेदी-विक्री करून देणगी देऊन किंवा अन्यथा संपादन करणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावणार नाही.

(ब) अन्य कोणत्याही प्रकरणी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या नकळत मालमत्ता संपादित करणार नाही, किंवा तिची विल्हेवाट लावणार नाही.

(२) रुपये ३०० हून अधिक किंमतीच्या कोणत्याही जंगम मालमत्तेसंबंधात खरेदी-विक्री, देणगी किंवा अन्य स्वरूपात कोणताही व्यवहार करणारा परिषद कर्मचारी, ज्याच्या हाताखाली काम करीत असेल त्या विभाग प्रमुखाला अशा व्यवहाराबद्दल तात्काळ कळवील :

परंतु कोणताही परिषद कर्मचारी १,००० रुपयांपेक्षा अधिक मूल्य असणाऱ्या जंगम मालमत्तेच्या बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मान्यता दिलेला विक्रेता किंवा अभिकर्ता (एजंट) यांच्या बरोबर किंवा त्यांच्यामार्फत असेल त्या व्यतिरिक्त किंवा विभाग प्रमुखाच्या पूर्वमंजुरीने असेल त्याव्यतिरिक्त (पूर्वमंजुरीकरिता अर्ज केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत अशी मंजुरी देण्यात आली नसेल तर ती मिळाल्याचे गृहित धरण्यात येईल असा कोणताही व्यवहार करणार नाही.)

**स्पष्टीकरण.**—पोट-नियम (२) च्या प्रयोजनार्थ, "जंगम मालमत्ता" या शब्दप्रयोगामध्ये पुढील मालमत्तेचा समावेश होतो,—

जसे—(अ) जवाहीर, विमापत्रे, शेअर्स, रोखे व ऋणपत्रे,

(ब) मोटारगाड्या, मोटारसायकली, घोडे किंवा वाहतुकीचे अन्य कोणतेही साधन,

(क) प्रशीतक (रेफ्रिजरेटर्स), रेडिओ व रेडिओग्राम.

(३) प्रत्येक परिषद कर्मचारी, जिल्हा सेवेवर त्याची प्रथम नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांस किंवा त्याने याबाबतीत अधिकार प्रदान केले असतील अशा कोणत्याही प्राधिकाऱ्यास, या नियमांसोबत जोडलेल्या नमुन्यात, त्याच्या मालकीच्या, त्याने संपादित केलेल्या किंवा त्यास वारसाहक्काने मिळालेल्या किंवा त्याने स्वतःच्या नावे किंवा आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे पट्ट्याने किंवा गहाण घेऊन धारण केलो असेल अशा सर्व स्थावर मालमत्तेचे विवरण सादर करील.

(४) पोट-नियम (३) अन्वये विवरण सादर केल्यानंतर कोणत्याही वेळी परिषद कर्मचारी परिषदेच्या सेवेत असताना कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करील किंवा वारसाहक्काने त्यास ती मिळेल किंवा स्वतःच्या नावे किंवा आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे पट्ट्याने किंवा गहाण घेऊन कोणतीही स्थावर मालमत्ता धारण करील तर तो ज्या दिनांकाला अशी स्थावर मालमत्ता त्याने संपादन केली असेल, वारसाहक्काने त्यास ती मिळाली असेल किंवा पट्ट्याने किंवा गहाण घेऊन धारण केली असेल त्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास उपरोक्त नमुन्यात अशा मालमत्तेच्या संबंधात एक विवरण सादर करील.

(५) पोट-नियम (३) व (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विवरण सादर करण्यात कसूर करील किंवा चुकीचे विवरण देईल असा प्रत्येक परिषद कर्मचारी, सेवेतून बडतर्फ केला जाण्यास पात्र असेल.

१८. **लवाद म्हणून काम करण्यास प्रतिबंध.**—परिषद कर्मचाऱ्याने धारण केलेल्या कोणत्याही पदामुळे त्याच्यापुढे कोणत्याही स्वरूपात जे कोणतेही खाजगी प्रकरण येण्याची शक्यता असेल त्या प्रकरणी तो लवाद म्हणून काम करणार नाही.

१९. **परिषद कर्मचाऱ्यांच्या कृतीचे व वर्तणुकीचे प्रतिसमर्थन.**—(१) कोणताही परिषद कर्मचारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय प्रतिकूल टीकेचा किंवा मानहानीकारक स्वरूपाच्या आक्रमणाचा विषय असेल अशा कोणत्याही अधिकृत कृत्याच्या समर्थनार्थ कोणत्याही न्यायालयाचा किंवा वृत्तपत्राचा अवलंब करणार नाही.

(२) पोट-नियम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे परिषद कर्मचाऱ्यास त्याच्या खाजगी चारित्र्याचे किंवा त्याने खाजगी स्वरूपात केलेल्या कोणत्याही कृत्याचे समर्थन करण्यास प्रतिरोध होतो असे समजण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—पोट-नियम (१) अन्वये मंजुरी देताना मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रत्येक प्रकरणी पुढील गोष्टी निश्चित करील,—

(अ) कार्यवाहीचा खर्च जिल्हा परिषद सोशील किंवा कसे,

(ब) परिषद कर्मचारी स्वखर्चाने (वैध) कार्यवाही दाखल करील किंवा कसे आणि त्याने तसे केल्यास व त्या प्रकरणी तो यशस्वी झाल्यास त्या बाबतीत न्यायालयाने त्यास कोणताही खर्च किंवा नुकसानभरपाई मंजूर केली असेल तर असा खर्च किंवा नुकसानभरपाई यांपेक्षा अधिक प्रमाणात त्याने केलेल्या खर्चाच्या संपूर्ण रकमेची किंवा अंशतः भरपाई जिल्हा परिषद करील किंवा कसे ;

(३) परिषद कर्मचाऱ्याने दाखल केलेल्या कार्यवाहीचा खर्च जिल्हा परिषदेने करण्याचे ठरविले असेल त्याबाबतीत, पोट-नियम (१) अन्वये देण्यात आलेल्या मंजुरीमध्ये असे स्पष्टपणे नमूद करण्यात येईल की, न्यायालयाकडून मंजूर करण्यात येईल अशा भरपाईच्या, नुकसानभरपाईच्या किंवा खर्चाच्या रकमेतून जिल्हा परिषदेने केलेला खर्च प्रथम वजा करण्यात येईल आणि शिल्लक राहिलेली कोणतीही रक्कम असल्यास ती, परिषद कर्मचारी स्वतः ठेवून घेईल.

२०. **विवाह करण्याची कारणे.**---(१) ज्याची पत्नी हयात असेल असा कोणताही परिषद कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची प्रथम परवानगी घेतल्याशिवाय, दुसरा विवाह मग त्या त्या वेळी त्याला लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्यान्वये असा नंतरचा विवाह अनुज्ञेय असला तरीही करणार नाही.

(२) कोणीही महिला परिषद कर्मचारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची प्रथम परवानगी घेतल्याशिवाय ज्याची पत्नी हयात असेल अशा कोणत्याही व्यक्तीशी विवाह मग त्या त्या वेळी तिला लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्यान्वये असा विवाह अनुज्ञेय असला तरीही करणार नाही.

२१. **अर्थविवरण.**---या नियमांच्या अर्थविवरणाच्या संबंधात कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास ती बाब राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल व त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

२२. **आपले अधिकार (दुसऱ्यास) सोपविण्याचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा अधिकार.**---मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे आणि त्याबाबतीत तो विनिर्दिष्ट करील अशा शर्तींस अधीन राहून, या नियमांखालील आपले कोणतेही अधिकार व कामे जिल्हा परिषदेखालील पद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

२३. **निरसन व व्यावृत्ती.**---या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले आणि परिषद कर्मचाऱ्यांना लागू असलेले कोणतेही नियम हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत :

परंतु असे निरसन झाले असेल तरीही अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या नियमांन्वये पूर्वी करण्यात आलेल्या गोष्टींस किंवा अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचा भंग केल्याच्या बाबतीत झालेली कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यांवर परिणाम होणार नाही.

## नमुना

(नियम १७ पहा)

श्री. ................................ यांच्या मालकीच्या त्यांनी संपादित केलेल्या वारसाहक्काने त्यांच्याकडे आलेल्या किंवा त्यांनी भाडेपट्टीने किंवा गहाणाद्वारे धारण केलेल्या स्थावर मालमत्तेचे विवरण--

(१) जिल्हा परिषद कर्मचाऱ्याचे नाव :

(२) धारण केलेले पद :

(३) सेवानिवृत्तीचा दिनांक :

(४) मालमत्तेचे विवरण :

(एक) मालकीची, संपादित केलेली किंवा वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता.

(दोन) भाडेपट्ट्याने किंवा गहाणाद्वारे धारण केलेली मालमत्ता.

*(तीन) मालमत्ता संपादन केल्याचा किंवा ती वारसाहक्काने मिळाल्याचा किंवा भाडेपट्ट्याने व गहाणद्वारे धारण केल्याचा दिनांक :

(५) ज्यांच्या नावे स्थावर मालमत्तेचा उल्लेख करण्यात आला असेल अशा त्याच्या कुटुंबातील एका किंवा अनेक सदस्यांची नावे :

(६) मालमत्तेचे अंदाजित मूल्य :

टीप.—(१) बाब क्रमांक ४ पुढे मालमत्तेचे संपूर्ण वर्णन देण्यात येईल. घरांच्या बाबतीत, ठिकाण जमिनीवरील बांधकामाचे सर्वसाधारण वर्णन, परिमाण, बांधणीचे वर्ष आणि ज्यासाठी ती वापरात आणली असेल ते प्रयोजन यांचा उल्लेख करण्यात येईल, तर जमिनीच्या बाबतीत स्थान, सर्वेक्षण क्रमांक, क्षेत्र, आकारणी आणि ज्यासाठी ती वापरात आणली असेल ते प्रयोजन यांचा उल्लेख करण्यात येईल.

(२) वारसाहक्काखेरीज अन्य रीतीने मालमत्ता संपादन करण्यात आली असेल, त्याबाबतीत दिलेली किंमत धरून, व्यवहाराचा तपशील बाब क्रमांक ६ समोर देण्यात येईल.

---

*जिल्हा परिषद कर्मचाऱ्याने त्याच्या नियुक्तीनंतर प्रथमच सादर केलेल्या विवरणाच्या बाबतीत लागू असणार नाही.

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४

## शासकीय अधिसूचना, सहकार व ग्रामविकास विकास, क्रमांक डीएसआर-१४६२-पाच दिनांक २९ ऑगस्ट १९६४

**(महराष्ट्र राजपत्र, भाग चार-ब, पृ. ११०६)**

शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक डीएसआर-१४६४-पाच, दिनांक ५ जुलै १९६५ द्वारे सुधारित [ महाराष्ट्र राजपत्र (इंग्रजी), भाग चार-ब, पृष्ठ १४१४ ] शासकीय अधिसूचना, क्रमांक डीबीआर-१४६७/२४५०५/पाच, दिनांक ३ ऑक्टोबर १९६८ द्वारे सुधारित.

शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक डीएसआर-१४६८/२३१८८-पाच, दिनांक २९ जानेवारी १९६९ द्वारे सुधारित [ महाराष्ट्र राजपत्र (इंग्रजी), भाग चार-ब, पृ. १७५ ]

शासकीय अधिसूचना क्रमांक डीएसआर-१४७१/३६९४०/ए-चार, दिनांक ११ नोव्हेंबर १९७१ द्वारे सुधारित.

शासकीय अधिसूचना क्रमांक डीईएन-१०८२/७९७/२३२५/७४/आठ-ब, दिनांक २० एप्रिल १९८३ द्वारे सुधारित.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ [ १९६२ चा महाराष्ट्र (पाच) ] याचे कलम २७४, पोट-कलम (२) च्या खंड (सदतीस) व खंड (एकोणचाळीस) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे, हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले होते.

### भाग एक—सर्वसाधारण

### (शिस्त व अपील)

१. **संक्षिप्त नाव, प्रयुक्ती व प्रारंभ.**—(१) या नियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ असे म्हणता येईल.

(२) हे नियम परिषदेचे जे कर्मचारी जिल्हा सेवेचे सदस्य असतील त्या सर्व कर्मचाऱ्यांना लागू होतील, मात्र जिल्हा परिषदेचे जे अंशकालिक कर्मचारी असतील किंवा ज्यांना केवळ आकस्मिक खर्चातूनच वेतन देण्यात येते अशा कर्मचाऱ्यांना ते लागू होणार नाहीत.

(३) नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, हे नियम शासकीय राजपत्रात ते अंतिम रीत्या ज्या तारखेस प्रसिद्ध करण्यात येतील त्या तारखेस अंमलात येतील, आणि इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, ते नेमून दिलेल्या दिवशी अंमलात यतील.

२. **व्याख्या.**—या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(अ) "अधिनियम" म्हणजे "महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१".

(ब) "नेमून दिलेला कर्मचारी" म्हणजे कलम २४१, या तरतुदी अंमलात आल्यामुळे जी नेमून दिलेल्या दिवसापासून एखाद्या जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी होईल

अशी कोणतीही व्यक्ती किंवा या अधिनियमाच्या कलम २४२ [१][किंवा कलम २५३(क)] अन्वये बदलीच्या दिनांकापासून [१][जी व्यक्ती अंतिम रीत्या जिल्हा सेवेकडे नेमून दिलेली असेल] अशी राज्य शासनाच्या सेवांतील कोणतीही व्यक्ती.

(क) "नियत दिनांक" म्हणजे, दिनांक १ मे १९६२.

(ड) "परिषद सेवकाच्या संबंधात 'नियुक्ती प्राधिकरण' म्हणजे (एक) परिषद कर्मचारी त्यावेळी ज्या जिल्हा सेवेचा सदस्य असेल, त्या जिल्हा सेवेतील एखाद्या पदावर किंवा संवर्गात किंवा परिषद कर्मचाऱ्याचा त्यावेळी ज्या जिल्हा सेवेत समावेश करण्यात आला असेल त्या जिल्हा सेवेतील कोणत्याही श्रेणीवर नियुक्ती करण्याकरिता अधिकार प्रदान करण्यात आलेले प्राधिकरण; किंवा

(दोन) ज्याने परिषद कर्मचाऱ्यांची यथास्थिती अशा सेवेवर, श्रेणीवर किंवा पदावर नियुक्ती केली असेल असे प्राधिकरण; किंवा

(तीन) परिषद कर्मचारी कोणत्याही इतर जिल्हा सेवेचा स्थायी सदस्य असल्यामुळे किंवा एखाद्या जिल्हा सेवेखाली कोणतेही इतर स्थायी पद कायम पद म्हणून धारण केलेले असल्यामुळे तो जिल्हा परिषदेच्या अखंड नोकरीत असेल त्याबाबतीत, ज्या प्राधिकरणाने त्याची त्या जिल्हा सेवेत किंवा त्या जिल्हा सेवेतील कोणत्याही श्रेणीवर किंवा त्या पदावर नियुक्ती केली असेल ते प्राधिकरण;

यापैकी जे सर्वोच्च असेल ते प्राधिकरण".

[२][(डअ) कलम २४१ चे उपबंध अंमलात आल्यामुळे जो जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा सेवक झाला असेल अशा नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या संबंधात बदलीची तारीख म्हणजे नियत दिवस आणि कलम २४२-(क) किंवा २५३-क अन्वये जो जिल्हा सेवेकडे अंतिम रीत्या नेमून दिलेला असेल अशा नेमून दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, ज्या तारखेस जिल्हा सेवेकडे तो अशा रीतीने अंतिम रीत्या नेमून दिलेला असेल ती तारीख.]

(इ) परिषद कर्मचाऱ्यांस शिक्षा करण्याच्या संबंधात "शिस्त विषयक प्राधिकरण" म्हणजे या नियमान्वये त्याच्यावर ती शिक्षा लादण्यास सक्षम असलेले प्राधिकरण.

(फ) "जिल्हा सेवा" म्हणजे, या अधिनियमाच्या कलम २३९ च्या खंड (ब) अन्वये रचना करण्यात आलेली कोणतीही सेवा.

(ग) "स्वीयेतर सेवा" म्हणजे, ज्या सेवेत परिषद कर्मचाऱ्यास जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीखेरीज अन्य कोणत्याही साधनाद्वारे जिल्हा परिषदेच्या मंजुरीने त्याच्या मूळ पदाचे वेतन मिळते अशी सेवा.

(ह) "विभाग प्रमुख" म्हणजे एखाद्या जिल्हा परिषदेचा विभाग प्रमुख.

(आय) "परिषद कर्मचारी" म्हणजे, जिल्हा सेवेचा सदस्य व त्यात स्वीयेतर सेवेवर असणाऱ्या ज्या व्यक्तीच्या अशा कोणत्याही शासनाकडे किंवा स्थानिक वा इतर प्राधिकरणांकडे तात्पुरत्या सोपविण्यात आल्या असतील अशा कोणत्याही व्यक्तीचा [३][आणि तसेच भारत सरकारच्या किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा एखाद्या स्थानिक वा अन्य प्राधिकरणाच्या सेवेतील ज्या व्यक्तीच्या सेवा जिल्हा सेवेकरिता एखाद्या जिल्हा परिषदेकडे तात्पुरत्या सोपविण्यात आल्या असतील अशा कोणत्याही व्यक्तीचा] समावेश होतो.

---

[१] पहा शासकीय अधिसूचना क्रमांक डीएसआर-१४७१/३६९४०/ए-चार, दिनांक ११ नोव्हेंबर १९७१.

[२] दिनांक २९ जानेवारी १९६९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[३] हा मजकूर शासकीय अधिसूचना दि. ५ जुलै १९७५ अन्वये जादा दाखल करण्यात आला.

## भाग दोन--पदावरून तात्पुरते दूर करणे.

३. **पदावरून तात्पुरते दूर करणे.**--- (१) (अ) परिषदेच्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तविषयक कार्यवाही पूर्ण झालेली असेल किंवा अनिर्णीत असेल त्याबाबतीत ; किंवा

(ब) कोणत्याही फौजदारी गुन्ह्याचा संबंधातील त्यांच्याविरुद्धच्या प्रकरणाचा बारीक तपास किंवा न्याय चौकशी करण्यात येत असेल त्याबाबतीत.

नियुक्ती प्राधिकरण किंवा असे नियुक्ती प्राधिकरण, जिल्हा परिषदेच्या ज्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यास दुय्यम असेल असा अधिकारी किंवा त्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केलेल्या जिल्हा परिषदेचा कोणताही इतर अधिकारी परिषदेच्या कर्मचाऱ्यास पदावरून निलंबित करू शकेल :

परंतु, पदावरून निलंबित करण्यासंबंधीचे आदेश नियुक्ती **प्राधिकरणाच्या** दर्जाहून कमी दर्जाच्या **प्राधिकरणाने** दिलेले असतील, त्याबाबतीत असे प्राधिकरण ज्या परिस्थितीत असा आदेश दिला गेला ती परिस्थिती नियुक्ती प्राधिकरणास ताबडतोब कळवावीत.

(२) परिषदेच्या ज्या कर्मचाऱ्यास फौजदारी स्वरूपाच्या आरोपाखाली किंवा अन्य कारणासाठी अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक मुदतीकरिता अभिरक्षेत स्थानबद्ध करण्यात आलेले असेल अशा कर्मचाऱ्यास स्थानबद्धतेच्या दिनांकापासून नियुक्ती **प्राधिकरणाच्या** आदेशाद्वारे पदावरून तात्पुरते दूर करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल व पुढील आदेश मिळेतोपर्यंत त्यास पदावरून दूर करण्यात येईल.

(३) पदावरून निलंबित करण्यात आलेल्या परिषद कर्मचाऱ्यास देण्यात आलेली बडतर्फीची, पदावरून काढून टाकण्याची किंवा सेवेतून सक्तीने निवृत्त होण्यासंबंधीची शिक्षा, या नियमान्वये केलेल्या अपिलास किंवा फेरतपासणीत रद्द करण्यात आली असेल आणि ते प्रकरण आणखी चौकशीसाठी किंवा कार्यवाहीसाठी किंवा कोणत्याही इतर निदेशांसह परत पाठविण्यात आलेले असेल त्या बाबतीत, त्यास पदावरून, **निलंबित** करण्याचा आदेश हा, बडतर्फीच्या पदावरून काढून टाकण्याच्या किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या मूळ आदेशाच्या दिनांकास किंवा त्या दिनांकापासून अंमलात असल्याचे चालू राहिल्याचे समजण्यात येईल व पुढील आदेश देण्यात येईतोपर्यंत तो अंमलात राहील.

(४) परिषदेच्या कर्मचाऱ्यास देण्यात आलेल्या बडतर्फीची, पदावरून निलंबित करण्याची किंवा सेवेतून सक्तीने निवृत्त होण्यासंबंधीची शिक्षा एखाद्या न्यायालयाच्या निर्णयामुळे किंवा त्या निर्णयाद्वारे रद्द झाली असेल किंवा ती शिक्षा निरर्थक म्हणून जाहीर करण्यात किंवा ठरविण्यात आली असेल आणि उक्त प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार केल्यावर ज्या आरोपांच्या आधारावर बडतर्फीची, पदावरून काढून टाकण्याची किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीची शिक्षा प्रथमतः देण्यात आली होती त्या आरोपांवर त्याच्याविरुद्ध आणखी चौकशी करण्याचे शिस्तविषयक **प्राधिकरणाने** ठरविले असेल त्या बाबतीत, बडतर्फीच्या पदावरून काढून टाकण्याच्या किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या मूळ आदेशाच्या तारखेपासून नियुक्ती **प्राधिकरणाने** परिषदेच्या कर्मचाऱ्यास पदावरून निलंबित केले होते असे समजण्यात येईल व पुढील आदेश देण्यात येईतोपर्यंत तो पदावरून निलंबित असल्याचे चालू राहील.

(५) ह्या नियमान्वये देण्यात आलेला किंवा देण्यात आल्याचे समजण्यात आलेला निलंबनाचा आदेश हा, ज्या **प्राधिकरणाकडून** तो देण्यात आला असेल किंवा देण्यात आल्याचे समजण्यात आले असेल ते **प्राधिकरण** किंवा ज्या अन्य प्राधिकरणास ते प्राधिकरण दुय्यम असेल असे कोणतेही प्राधिकरण, कोणत्याही वेळी रद्द करू शकेल.

## भाग तीन---शिस्त

४. **शिक्षांचे स्वरूप.**---त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या तरतुदींस बाध येऊ न देता, योग्य व पुरेशा कारणांकरिता व यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे परिषद कर्मचाऱ्यास पुढील शिक्षा देता येतील :---

(एक) ठपका ठेवणे;

(दोन) वेतनवाढी किंवा पदोन्नती थोपवून धरणे;

(तीन) हयगय केल्यामुळे किंवा आदेशांचा भंग केल्यामुळे जिल्हा परिषदेस पोहोचलेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची सर्व रक्कम किंवा तिचा भाग वेतनातून वसूल करणे;

(चार) निम्न सेवेत, श्रेणीत किंवा पदावर आणणे किंवा निम्न समयश्रेणीत किंवा समय-श्रेणीतील निम्नस्तरावर आणणे;

(पाच) सक्तीची सेवानिवृत्ती;

(सहा) सेवेतून काढून टाकणे—मात्र ही घटना भावी नोकरीसाठी अपात्रता ठरणार नाही;

(सात) सेवेतून बडतर्फ करणे—अशी बडतर्फी सामान्यतः भावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल;

(आठ) जिल्हा सेवा (वर्ग चार) च्या परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दहा रुपयांहून अधिक नसेल असा द्रव्यदंड व जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) च्या अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पंचवीस रुपयांहून अधिक नसेल असा दंड.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या अर्थान्तर्गत पुढील गोष्टी शिक्षा ठरणार नाहीत :—

(एक) परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या किंवा पदाच्या किंवा त्याच्या नियुक्तीच्या अटींचे नियमन करणाऱ्या नियमांनुसार किंवा आदेशांनुसार विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे त्याची वेतनवाढ थोपवून धरणे;

(दोन) परिषद कर्मचारी दक्षतारोध ओलांडण्यास अपात्र असल्याच्या कारणावरून समय-श्रेणीतील दक्षतारोधाच्या ठिकाणी त्यास थोपवून धरणे;

(तीन) परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रकरणाचा विचार करण्यात आल्यानंतर ज्या सेवेत, श्रेणीवर किंवा पदावर पदोन्नती मिळण्यास तो पात्र असेल त्या सेवेत, श्रेणीवर किंवा पदावर त्यास स्थायी किंवा स्थानापन्न या नात्याने पदोन्नती न देणे;

(चार) एखाद्या उच्च सेवेत, श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न असलेल्या परिषद कर्म-चाऱ्याचे न्यायचौकशीनंतर तो अशी उच्च सेवा, श्रेणी किंवा पद यांकरिता अयोग्य असल्याचे ठरविण्यात आल्याच्या कारणावरून किंवा त्याच्या वर्तनाशी ज्याचा संबंध नसेल अशा प्रशासकीय कारणांवरून निम्न सेवेवर श्रेणीवर किंवा पदावर प्रत्यावर्तन होणे;

(पाच) दुसरी सेवा, श्रेणी किंवा पद यांवर परिवीक्षेने नियुक्ती करण्यात आलेल्या परिषद कर्मचाऱ्यांचे, त्यांच्या नियुक्तीच्या शर्ती किंवा परिवीक्षेबाबतचे नियम व आदेश यानुसार परिवीक्षेच्या मुदतीत किंवा त्या मुदतीच्या शखेरीस त्याच्या स्थायी सेवेवर, श्रेणीवर किंवा पदांवर प्रत्यावर्तन होणे;

(सहा) परिषद कर्मचाऱ्यांचा नियम सेवावधी किंवा सेवानिवृत्ती यांच्याशी संबंधित तरतुदीं-नुसार त्यास सक्तीने सेवानिवृत्त करणे;

(सात) (अ) परिषद कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या शर्ती किंवा परिवेक्षेबाबतचे नियम व आदेश यांनुसार, परिवेक्षेच्या मुदतीत किंवा त्या मुदतीच्या अखेरीस परिवेक्षेवर नियुक्ती करण्यात आलेल्या परिषद कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करणे,

(ब) परिषद कर्मचाऱ्यांच्या वर्तनाशी संबंध नसणाऱ्या कारणावरून त्यांची सेवा समाप्त करणे.

५. **शिस्तविषयक प्राधिकरण.**—(१). [1][ नियम ११ च्या तरतुदींच्या अधीनतेने ] मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, कोणत्याही परिषद कर्मचाऱ्यावर नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादता येईल.

---

[1] पहा शासकीय अधिसूचना क्र. डीएसआर-१४४७/२४५०५/पाच, दिनांक ३ ऑक्टोबर १९६८.

(२) पोट-नियम (१) च्या तरतुदींस बाध न येता, नियुक्ती प्राधिकरण किंवा त्याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने अधिकार प्रदान केलेले कोणतेही प्राधिकरण परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास नियम ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा मुख्य कार्यकारी अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मर्यादेपर्यंत व अशा शर्तीस अधीन राहून, देऊ शकेल.

५. मोठी शिक्षा देण्याची कार्यपद्धती.—(१) [१][ नियम ११ च्या तरतुदींच्या अधीनतेने ] नियम ४ चे खंड (चार) ते (सात) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा परिषद कर्मचाऱ्यावर लादणारा आदेश शक्यतोवर, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने चौकशी केल्याशिवाय काढण्यात येणार नाही.

(२) शिस्तविषयक प्राधिकरण, ज्या अभिकथनावरून चौकशी करण्याचे योजिले असेल त्या अभिकथनांवर आधारित निश्चित दोषारोप तयार करील. असे दोषारोप ज्या अभिकथनांवर आधारलेले असतील त्या अभिकथनांच्या निवेदनासह असे दोषारोप परिषद कर्मचाऱ्यांस लेखी कळविण्यात येतील. व त्यास शिस्तविषयक प्राधिकरण विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत, अशा प्राधिकरणाकडे आपल्या बचावाचे लेखी निवेदन सादर करण्यास तसेच त्यास व्यक्तिशः आपली बाजू मांडण्याची इच्छा आहे किंवा कसे ते कळविण्यात फर्माविण्यात येईल.

(३) बचावाचे लेखी निवेदन मिळाल्यानंतर किंवा पोट-नियम (२) अन्वये असे कोणतेही निवेदन न मिळाल्यास, शिस्तविषयक प्राधिकरणास, निवेदनात कबूल न करण्यात आलेल्या दोषारोपांची स्वतःच चौकशी करता येईल किंवा त्या प्रयोजनाकरिता एखाद्या चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करणे त्यास आवश्यक वाटल्यास त्यास तसे करता येईल.

(४) परिषद कर्मचाऱ्यास आपला बचाव तयार करता यावा यासाठी तो विनिर्दिष्ट करील अशा कार्यालयीन अभिलेखाचे निरीक्षण करण्याची व अशा अभिलेखांतील उतारे घेण्याची त्यास परवानगी देण्यात येईल :

परंतु लेखी नमूद करण्यात येतील अशा कारणावरून असे अभिलेख उक्त प्रयोजनाशी संबंधित नाहीत किंवा परिषद कर्मचाऱ्यास ते पाहू देणेही लोकहिताच्या विरुद्ध आहे असे शिस्तविषयक प्राधिकरणाचे किंवा यथास्थिती चौकशी अधिकाऱ्याचे मत असेल तर अशी परवानगी नाकारता येईल.

(५) शिस्तविषयक प्राधिकरणास दोषारोपांची चौकशी करणाऱ्या प्राधिकरणामुळे (यात यापुढे ज्याचा निर्देश चौकशी प्राधिकरण असा करण्यात आला आहे) दोषारोपांचे समर्थन करण्याकरिता प्रकरण मांडण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस नामनिर्देशित करता येईल. परिषद कर्मचारी, परिषदेच्या अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सहाय्याने आपले प्रकरण मांडील. परंतु, शिस्तविषयक प्राधिकरणाने वर सांगितल्याप्रमाणे नामनिर्देशित केलेली व्यक्ती विधी-व्यवसायी असल्याखेरीज किंवा शिस्तविषयक प्राधिकरणाने ह्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन तशी परवानगी दिली असेल त्याखेरीज परिषद कर्मचारी आपले प्रकरण मांडण्याच्या प्रयोजनासाठी विधी व्यवसायीची नियुक्ती करणार नाही.

(६) चौकशी प्राधिकरण चौकशी चालू असताना दोषारोपांशी संबंधित किंवा महत्त्वाचा असेल असा लेखी पुरावा विचारात घेईल व असा तोंडी पुरावा घेईल. परिषद कर्मचाऱ्यास दोषारोपांच्या समर्थनार्थ, तपासणी करण्यात आलेल्या साक्षीदारांची उलटतपासणी करण्याचा व व्यक्तिशः पुरावा देण्याचा अधिकार असेल. आरोपांच्या समर्थनार्थ बाजू मांडणाऱ्या व्यक्तीस परिषद कर्मचाऱ्यांची व त्याच्या बचावाच्या वेळी तपासणी केलेल्या साक्षीदारांची उलटतपासणी करण्याचा अधिकार असेल. कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा संबंधित किंवा महत्त्वाचा नाही या कारणावरून त्याची उलटतपासणी करण्यास चौकशी प्राधिकरणाने नकार दिल्यास ते त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करील.

---

[१] पहा शासकीय अधिसूचना क्र. डीएसआर-१४४७/२४५०५/पाच, दिनांक ३ ऑक्टोबर १९६८.

(७) चौकशीचे कामकाज समाप्त झाल्यावर चौकशी प्राधिकरण चौकशीचा अहवाल तयार करील व प्रत्येक आरोपाची कारणे देऊन त्यावरील त्याचे निष्कर्ष नमूद करील. चौकशीच्या कामकाजावरून सिद्ध झालेले दोषारोप हे मुळात तयार केलेल्या आरोपाहून भिन्न आहेत असे जर अशा प्राधिकरणाचे मत असेल तर त्यास अशा दोषारोपांवरील निष्कर्ष नमूद करता येतील :

परंतु ज्या वस्तुस्थितीमुळे परिषद कर्मचाऱ्यावर असे आरोप लादण्यात आले ती वस्तुस्थिती त्याने मान्य केल्याखेरीज किंवा त्या दोषारोपाविरुद्ध आपला बचाव करण्याची त्यास संधी दिल्याखेरीज अशा दोषारोपावरील निष्कर्ष नमूद करण्यात येणार नाहीत.

(८) चौकशीच्या अभिलेखात पुढील गोष्टींचा समावेश करण्यात येईल :--

(१) परिषद कर्मचाऱ्याविरुद्ध तयार केलेले दोषारोप आणि पोट-नियम (२) अन्वये त्यास देण्यात आलेले दोषारोपाचे निवेदन;

(२) त्याच्या बचावाचे कोणतेही निवेदन असल्यास ते निवेदन;

(३) चौकशी चालू असताना घेतलेला तोंडी पुरावा;

(४) चौकशी चालू असताना विचारात घेतलेला लेखी पुरावा;

(५) शिस्तविषयक प्राधिकरणाने व चौकशी प्राधिकरणाने चौकशीबाबत कोणतेही आदेश काढले असल्यास असे आदेश; आणि

(६) प्रत्येक दोषारोपावरील निष्कर्ष दाखविणारा अहवाल व आरोपाची कारणे.

(९) शिस्तविषयक प्राधिकरण हे चौकशी प्राधिकरण तसेच त्याबाबतीत ते [1][चौकशीच्या] अभिलेखावर विचार करील व प्रत्येक आरोपावरील आपले निष्कर्ष नमूद करील.

(१०) (एक) आरोपावरील आपले निष्कर्ष विचारात घेता नियम ४ च्या खंड (चार) ते (सात) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादली पाहिजे असे शिस्तविषयक प्राधिकरणाचे मत असेल तर तो,--

(अ) परिषद कर्मचाऱ्यास, चौकशी प्राधिकरणाच्या अहवालाची एक प्रत पाठवील व शिस्तविषयक प्राधिकरण हे चौकशी प्राधिकरण नसेल. त्याबाबतीत चौकशी प्राधिकरणाने काढलेल्या निष्कर्षांबाबत त्याचे काही मतभेद असल्यास, मतभेदाच्या कारणांसह त्याच्या निष्कर्षांचे निवेदन परिषद कर्मचाऱ्यास पाठविला; आणि

(ब) त्यावर जी शिक्षा लादण्याचे योजिले असेल ती शिक्षा नमूद केलेली व त्या प्रस्तावित शिक्षेवर त्यास कोणतेही अभिवेदन करण्याची इच्छा असेल, तर ते अभिवेदन विनिर्दिष्ट मुदतीत सादर करण्यास त्याला फर्माविणारी नोटीस देईल. परंतु असे अभिवेदन चौकशी चालू असताना पुढे आलेल्या पुराव्यावरून आधारित असेल.

(दोन) परिषद कर्मचाऱ्याने खंड (एक) खालील नोटिशीला अनुसरून कोणतेही अभिवेदन केले असल्यास त्यावर शिस्तविषयक प्राधिकरण विचार करील व परिषद कर्मचाऱ्यावर (लादावयाची झाल्यास) कोणती शिक्षा लादावी ते निश्चित करील आणि त्या प्रकरणात योग्य ते आदेश देईल.

(११) नियम ४ च्या खंड (एक) ते (तीन) व खंड (आठ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादण्यात यावी असे शिस्तविषयक प्राधिकरणाचे स्वतःच्या निष्कर्षांवरून मत होईल तर त्या प्रकरणी ते योग्य तो आदेश देईल.

(१२) शिस्तविषयक प्राधिकरणाने दिलेले आदेश परिषद कर्मचाऱ्यास कळविण्यात येतील, तसेच त्यास चौकशी प्राधिकरणाच्या अहवालाची एक प्रत देण्यात येईल व शिस्तविषयक प्राधिकरण हे चौकशी प्राधिकरण नसेल त्याबाबतीत त्याने स्वतः काढलेल्या निष्कर्षांबाबतचे एक निवेदन व चौकशी प्राधिकरणाच्या निष्कर्षांबाबत त्याचे काही मतभेद असल्यास त्याबाबतची कारणे थोडक्यात

---

[1] दिनांक ५ जुलै १९६५ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

देऊन त्यासह चौकशी प्राधिकरणाच्या निष्कर्षाच्या निवेदनाची एक प्रत परिषद कर्मचाऱ्याकडे ही निवेदने आधीच त्यांच्याकडे पाठविली नसतील तर पाठविण्यात येईल.

७. **किरकोळ शिक्षा लादण्याबाबतची कार्यपद्धती.**—(१) (अ) परिषद कर्मचाऱ्यास त्याच्याविरुद्ध करण्यात यावयाची कारवाईबाबतचा प्रस्ताव आणि ज्या अभिकथनावरून अशी कारवाई करण्याचे योजिले असेल ती अभिकथने यांची लेखी सूचना दिल्याखेरीज व त्यास कोणतेही अभिवेदन करण्याची इच्छा असल्यास, ते करण्याची त्यास संधी दिल्याखेरीज; आणि

(ब) असे कोणतेही अभिवेदन असल्यास, त्यावर शिस्तविषयक प्राधिकरणाने विचार केला असल्याखेरीज, नियम ४ चे खंड (एक) ते (तीन) व खंड (आठ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही शिक्षा लादणारा आदेश देण्यात येणार नाही.

(२) अशा प्रकरणांमधील कामकाजाच्या अभिलेखात पुढील गोष्टींचा समावेश होतो,—

(एक) परिषद कर्मचाऱ्यास, त्याच्याविरुद्ध करण्यात यावयाच्या कारवाईच्या प्रस्तावाची दिलेली एक प्रत;

(दोन) त्यास कळविलेल्या प्राधिकरणाच्या निवेदनाची प्रत;

(तीन) त्याने कोणतेही अभिवेदन केले असल्यास, ते अभिवेदन; आणि

(चार) त्या प्रकरणावरील आदेश व त्याबाबतची कारणे.

८. **संयुक्त चौकशी.**—(१) कोणत्याही प्रकरणात, जिल्हा परिषदेच्या, दोन किंवा अधिक कर्मचाऱ्यांचा किंवा दोन किंवा अधिक जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांचा संबंध असेल त्यावेळी पहिल्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अशा सर्व कर्मचाऱ्यांवर सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा लादण्यास सक्षम असलेले अन्य कोणतेही प्राधिकरण व दुसऱ्या बाबतीत विभागीय आयुक्त, या सर्व कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्याकरिता एकत्रित कार्यवाही करावी असा आदेश देऊ शकेल.

(२) अशा कोणत्याही आदेशात पुढील गोष्टी विनिर्दिष्ट करण्यात येतील,—

(एक) अशा एकत्रित कार्यवाहीकरिता शिस्तविषयक प्राधिकरण आणि चौकशीविषयक प्राधिकरण म्हणून जे कार्य करील ते प्राधिकरण;

(दोन) असे शिस्तविषयक प्राधिकरण ज्या शिक्षा लादण्यास सक्षम असेल अशा नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा; आणि

(तीन) नियम ६ किंवा ७ मध्ये विहित केलेली कार्यपद्धती कार्यवाहीत अनुसरण्यात येईल किंवा कसे.

(३) पोट-नियम (१) अन्वये एकत्रित कार्यवाही करण्याचा निदेश देण्यात आला असेल त्या-बाबतीत, चौकशी प्राधिकरण विनिर्दिष्ट करील त्या जागी किंवा अशा अनेक जागी दोषारोपा-बाबतची चौकशी करण्यात येईल.

९. **विवक्षित प्रकरणामध्ये अनुसरावयाची विशेष कार्यपद्धती.**—नियम ६, ७ व ८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,—

(एक) ज्या वर्तनामुळे फौजदारी गुन्ह्याच्या आरोपावरून परिषद कर्मचाऱ्यास दोषी ठरविण्यात आले असेल अशा वर्तनाच्या कारणास्तव त्याच्यावर शिक्षा लादण्यात आली असेल त्याबाबतीत; किंवा

(दोन) लेखी नमूद करावयाच्या कारणावरून उक्त नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली पद्धत अनुसरणे वाजवीरीत्या शक्य नाही याबाबत शिस्तविषयक प्राधिकरणाची खात्री झाली असेल त्याबाबतीत;

शिस्तविषयक प्राधिकरण प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार करील व त्यावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देईल.

**शासन इत्यादींकडे तात्पुरत्या नेमून दिलेल्या परिषद कर्मचाऱ्याबाबत तरतुदी.**—(१)
**१०.** शासन इत्यादींकडे तात्पुरत्या नेमून दिलेल्या परिषद कर्मचाऱ्याबाबत तरतुदी किंवा त्यास अधीन असलेल्या
परिषद कर्मचाऱ्याच्या सेवा भारतातील कोणत्याही शासनाकडे किंवा त्यास अधीन असलेल्या (या नियमाचा यापुढे
एखाद्या प्राधिकरणाकडे किंवा एखाद्या स्थानिक वा अन्य प्राधिकरणाकडे तात्पुरत्या
ज्याचा निर्देश "सेवा उसनवारीने घेणारे प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) तात्पुरत्या
नेमून दिलेल्या असतील त्याबाबतीत, सेवा उसनवारीने घेणाऱ्या प्राधिकरणास अशा कर्मचाऱ्यास
सेवेतून निलंबित करण्याच्या प्रयोजनार्थ नियुक्ती प्राधिकरणाचे आणि अशा कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्त-
भंगविषयक कारवाई करण्याच्या प्रयोजनार्थ शिस्तविषयक प्राधिकरणाचे अधिकार असतील :

परंतु, सेवा उसनवारीने घेणारे प्राधिकरण ज्या परिस्थितीवरून कर्मचाऱ्यास अशा प्रकारे सेवेतून
निलंबित करण्यासंबंधीचा आदेश काढावा लागला ती परिस्थिती किंवा यथास्थिती शिस्तभंग-
विषयक कार्यवाहीस झालेला प्रारंभ याविषयी मुख्य कार्यवाही अधिकाऱ्यास ताबडतोब कळवील.

(२) परिषद कर्मचाऱ्याविरुद्ध करण्यात आलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या निष्कर्षांच्या
अनुरोधाने,—

(एक) नियम ४ खंड (एक) ते (तीन) व खंड (आठ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी
कोणतीही शिक्षा त्या कर्मचाऱ्यावर करण्यात यावी असे सेवा उसनवारीने घेणाऱ्या प्राधिकरणाचे
मत असेल त्याबाबतीत त्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून त्या प्रकरणी
त्यास आवश्यक वाटतील असे आदेश देता येतील :

परंतु सेवा उसनवारीने घेणारे प्राधिकरण व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यात मतभेद
झाल्यास परिषद कर्मचाऱ्याची सेवा जिल्हा परिषदेकडे पुन्हा सोपविण्यात येईल.

(दोन) नियम ४ खंड (चार) ते (सात) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही
शिक्षासह लादण्यात यावी, असे सेवा उसनवारी घेणाऱ्या प्राधिकरणाचे मत असेल त्याबाबतीत,
ते त्या कर्मचाऱ्यांची सेवा पुन्हा जिल्हा परिषदेकडे सोपवील व नियम ६ च्या पोट-नियम
(२) ते (५) तरतुदींचे पालन केल्यानंतर चौकशीच्या कामकाजाचा अहवाल मुख्य कार्यकारी
अधिकारीकडे पाठवील व त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, तो शिस्तविषयक प्राधिकारी
असल्यास, त्यास आवश्यक वाटेल असे आदेश त्यावर देऊ शकेल किंवा तो असा शिस्तविषयक
प्राधिकरण नसल्यास, तो ते प्रकरण शिस्तविषयक प्राधिकरणाकडे पाठवील व शिस्तविषयक
प्राधिकरण सेवा उसनवारीने घेणाऱ्या प्राधिकरणाने त्यास पाठविलेल्या चौकशीच्या काम-
काजाच्या अहवालांच्या आधारे, किंवा त्यास योग्य वाटेल अशी अधिक चौकशी केल्यानंतर
त्या प्रकरणावर त्यास आवश्यक वाटतील असे आदेश देईल :

परंतु असे कोणतेही आदेश देताना शिस्तविषयक प्राधिकरण नियम ६, पोट-नियम (१०) व
(११) च्या तरतुदींचे पालन करील.

(३) परिषद कर्मचाऱ्याची सेवा उसनवारीने देताना मुख्य कार्यकारी अधिकारी या नियमांच्या
व नियम ६ च्या तरतुदी सेवा उसनवारीने घेणाऱ्या प्राधिकरणाच्या निदर्शनास आणील.

**शासन इत्यादीकडून उसनवारीने घेतलेले अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यासंबंधातील**
**११.** **शासन इत्यादीकडून** उसनवारीने घेतलेले अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यासंबंधातील जिल्हा परिषदेने जिल्हा सेवेकरिता भारतातील कोणत्याही सरकारच्या किंवा त्याला
**तरतुदी.**— (१) एखाद्या जिल्हा परिषदेने जिल्हा सेवेकरिता भारतातील कोणत्याही सरकारच्या किंवा त्याला
दुय्यम असणाऱ्या एखाद्या प्राधिकरणाची किंवा एखाद्या स्थानिक वा अन्य प्राधिकरणाच्या एखाद्या
अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या सेवा उसन्या घेतल्या असतील त्याबाबतीत, मुख्य कार्यकारी अधिका-
ऱ्यांस त्या कर्मचाऱ्यास पदावरून निलंबित करण्याच्या प्रयोजनासाठी नियुक्ती प्राधिकरणाचे व त्या कर्मचा-
ऱ्याचे विरुद्ध शिस्त भंगविषयक कार्यवाही करण्याकरिता शिस्तविषयक प्राधिकरणाचे अधिकार असतील :

परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी, ज्या परिस्थितीत कर्मचाऱ्यास पदावरून निलंबित करण्या-
संबंधी किंवा यथास्थित शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यासंबंधी आदेश देण्यात आला असेल त्या
परिस्थितीत ज्या प्राधिकरणाने अशा अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या सेवा उसन्या दिल्या असतील
त्या प्राधिकरणास (या नियमात यापुढे ज्याचा निर्देश "सेवा उसनवारीने देणारे प्राधिकरण" असा

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०००

### अधिसूचना

315

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर. ११९९/प्र. क्र. १३/९९/११/—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकानुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (सुधारणा) नियम, २००० म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम १२ मध्ये उपनियम (तीन) नंतर पुढील पोटनियम समाविष्ट करण्यात यावा :—

"(चार) अपचारी शासकीय कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर शिस्तभंग कारवाई तात्काळ संपुष्टात येते. त्यामुळे या नियमाखालील कोणतीही शिस्तभंग कारवाई संबंधित अपचारी शासकीय कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर चालू ठेवता येणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा. वि. कोकणे,
शासनाच्या उप सचिव.

[illegible] दिनांक २ ऑक्टोबर १९९८.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd February 2000

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR. 1199/C.R. 13/99/11.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) (Amendment) Rules, 2000.

2. In rule 13 of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, after sub-rule (*iii*), the following sub-rule shall be added, namely :—

" (*iv*) Disciplinary proceeding come to an end immediately on the death of the delinquent Government Servant. No disciplinary proceedings under these rules, can therefore, be continued after the death of the concerned Government Servant. "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. V. KOKANE,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

त्या प्राधिकरणास (या नियमात यापुढे ज्याचा निर्देश " सेवा उसनवारीने देणारे प्राधिकरण " असा

करण्यात आला आहे) ताबडतोब कळवील. [1][परंतु आणखी असे की, सेवा उसनवारीने देण्याच्या प्राधिकरणाखाली अशा अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास लागू असणाऱ्या कायद्याद्वारे विहित करण्यात आलेल्या पद्धतीनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीचे कामकाज चालविण्यात येईल.]

(२) अशा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध करण्यात आलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील निष्कर्षावरून,—

(एक) नियम ४ च्या खंड (एक) ते (दोन) व खंड (आठ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही शिक्षा त्या कर्मचाऱ्यावर लादण्यात यावी असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे मत होईल तर तो, सेवा उसनवारीने देणाऱ्या प्राधिकरणाशी विचारविनिमय करून त्या प्रकरणी त्यास आवश्यक वाटतील असे आदेश देऊ शकेल :

परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी व सेवा उसनवारीने देणारे प्राधिकरण यांच्यात मतभेद झाल्यास, अशा अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची सेवा, अशी सेवा उसनवारीने देणाऱ्या प्राधिकरणाकडे पुन्हा सोपविता येतील.

(दोन) नियम ४ च्या खंड (चार) ते (सहा) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा त्या कर्मचाऱ्यावर लादण्यात यावी असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे मत होईल त्याबाबतीत, तो त्या कर्मचाऱ्याच्या सेवा, सेवा उसनवारीने देणाऱ्या प्राधिकरणाकडे पुन्हा सोपवील व त्या प्राधिकरणास आवश्यक वाटेल अशा कारवाईसाठी चौकशीचे कामकाज त्याच्याकडे पाठवील.

(३) सेवा उसनवारीने देणाऱ्या प्राधिकरणाकडून त्याच्या अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची सेवा उसनवारीने देतेवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पोट-नियम (२) च्या खंड (एक) व (दोन) च्या तरतुदी त्या प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देईल.

## भाग चार—अपिले व पुनर्रक्षणे

१२. **निलंबनाच्या आदेशाविरुद्ध अपिले.**—(१) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांव्यतिरिक्त अन्य प्राधिकरणाने ज्या परिषद कर्मचाऱ्यांविरुद्ध त्यास पदावरून निलंबित करण्याबद्दलचा आदेश दिला असेल किंवा दिला असल्याचे मानण्यात येत असेल अशा कर्मचाऱ्यास, अशा आदेशाविरुद्ध मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिलेल्या किंवा दिल्याचे मानण्यात येणाऱ्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

१३. **शिक्षा लादणाऱ्या आदेशांविरुद्ध अपिले.**—(१) नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादणाऱ्या आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या परिषद कर्मचाऱ्यास पुढील अधिकाऱ्यांकडे अपील करता येईल,—

(अ) परिषद कर्मचारी लिपिकवर्गीय किंवा सांख्यिकी सेवेत असेल आणि समाजकल्याण अधिकारी, गट विकास अधिकारी, महसूल अधिकारी किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्यांना दुय्यम असणारे कोणतेही प्राधिकरण यांनी तो आदेश दिला असेल त्याबाबतीत, उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे ;

(ब) परिषद कर्मचारी, कार्यकारी व ग्रामविस्तार सेवेत असेल व खंड (अ) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने तो आदेश दिला असेल तर, प्रशासकीय अधिकाऱ्याकडे;

(क) परिषद कर्मचारी खंड (अ) व (ब) मध्ये निर्देशिलेल्या सेवा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सेवेत असेल व तो, खंड (अ) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने दिला असेल त्याबाबतीत ज्याच्या हाताखाली तो काम करीत असेल त्या विभाग प्रमुखाकडे;

---

[1] पहा शासकीय अधिसूचना क्रमांक डीबीआर-१४६७/२४५०५/पाच, दिनांक ३ ऑक्टोबर १९६८.

(ड) उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, प्रशासकीय अधिकाऱ्याने किंवा विभाग प्रमुखाने आदेश दिला असेल त्याबाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे;

(इ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने आदेश दिला असेल त्याबाबतीत, [1][अतिरिक्त] विभागीय आयुक्ताकडे;

(फ) विभाग प्रमुखाला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाकडून आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, विभाग प्रमुखाकडे.

१४. **इतर आदेशांविरुद्ध अपिले.**—(१) परिषद कर्मचाऱ्यास, ज्या आदेशामुळे—

(अ) कोणत्याही नियमान्वये विनियमित केले जाणारे त्याचे वेतन, भत्ते, निवृत्तिवेतन, किंवा सेवेच्या इतर शर्ती नाकारण्यात येतील किंवा त्याचे अहित होईल अशा प्रकारे त्यामध्ये फेरफार करण्यात येत असेल; किंवा

(ब) त्याला लागू असणाऱ्या नियमांनुसार तो ज्या पदोन्नतीस अन्यथा पात्र असेल व त्याच्या वरिष्ठतेनुसार जी पदोन्नती त्यास मिळावयाची असेल अशी पदोन्नती नाकारण्यात आली असेल; किंवा

(क) अशा कोणत्याही नियमाच्या तरतुदीचा त्याचे अहित होईल अशा प्रकारे अर्थ लावण्यात येत असेल; किंवा

(ड) दक्षता रोध ओलांडण्यास तो योग्य नाही या कारणावरून त्यास समयश्रेणीत दक्षता रोधाकडे थोपविण्यात येत असेल; किंवा

(इ) उच्च श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न असताना शिक्षेव्यतिरिक्त अन्यथा, त्यास निम्न श्रेणीत किंवा पदावर प्रत्यावर्तित करण्यात आले असेल; किंवा

(फ) निवृत्तिवेतन कमी करण्यात आले असेल किंवा रोखून धरण्यात आले असेल किंवा नियमान्वये अनुज्ञेय असलेले कमाल निवृत्तिवेतन नाकारण्यात येत असेल; किंवा

(ग) त्याची पदावर पुन्हा नेमणूक झाल्यावर, त्याच्या निलंबनाच्या कालावधीकरिता त्यास द्यावयाचे वेतन व भत्ते ठरविण्यात आले असतील किंवा अशी मुदत ही, कोणत्याही प्रयोजनार्थ कर्तव्यार्थ मुदत असल्याचे समजण्यात यावे किंवा कसे हे ठरविण्यात आले असेल.

अशा आदेशाविरुद्ध, जो आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिला असेल त्याबाबतीत, [1][अतिरिक्त] विभागीय आयुक्ताकडे व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास दुय्यम असणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाने असा आदेश दिला असेल त्याबाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या नियमात,—

(१) "परिषद कर्मचारी" या शब्दप्रयोगामध्ये, जी जिल्हा सेवेचा सदस्य असण्याचे बंद झालेले आहे अशा व्यक्तीचा समावेश होतो.

(२) "निवृत्तिवेतन" या शब्दप्रयोगात अतिरिक्त निवृत्तिवेतन, उपदान व अन्य कोणताही सेवानिवृत्ती लाभ यांचा समावेश होतो.

१५. **पुनरीक्षण.**—(१) एखाद्या परिषद कर्मचाऱ्याने नियम १३ अन्वये दाखल केलेल्या अपिलावर देण्यात आलेल्या आदेशामुळे तो पीडीत झाला असेल त्याबाबतीत, त्यास—

(अ) अपिलावरील आदेश प्रशासकीय अधिकाऱ्याने विभाग प्रमुखाने, किंवा उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिला असेल त्याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे;

---

[1] पहा शासकीय अधिसूचना क्रमांक डीईएन-१०८२/७९७/(२३२५/७९)/आठ-ब, दिनांक २० एप्रिल १९८३.

(ब) अपिलावरील आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिला असेल त्याबाबतीत, विभागीय आयुक्ताकडे;

(क) अपिलावरील आदेश विभागीय आयुक्ताने दिला असेल त्या बाबतीत राज्य शासनाकडे, त्या आदेशाच्या पुनरीक्षणार्थ अर्ज करता येईल :

परंतु, नियम ४ च्या खंड (एक) ते (तीन) व खंड (आठ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा नोंदणाऱ्या आदेशाविरुद्ध किंवा त्या नियमाच्या खंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा लादणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध असा अर्ज करण्याचा परिषद कर्मचाऱ्यास अधिकार असणार नाही;

(२) परिषद कर्मचाऱ्याने नियम १४ अन्वये केलेल्या अपिलावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे जो कर्मचारी पीडीत झाली असेल, त्याबाबतीत, त्यास त्या आदेशाच्या पुनरीक्षणार्थ विभागीय आयुक्ताकडे अर्ज करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनार्थ "दुय्यम प्राधिकरण" या शब्द प्रयोगाचा अर्थ पुनरीक्षण प्राधिकरणाच्या संबंधाप्रमाणे होतो :—

(एक) मुख्य कार्यकारी अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, गट विकास अधिकारी, महसूल अधिकारी अशा अधिकाऱ्यांना दुय्यम असणारे कोणतेही प्राधिकरण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख किंवा विभाग प्रमुखाला दुय्यम असणारे कोणतेही प्राधिकरण;

(दोन) विभागीय आयुक्त, प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी;

(तीन) राज्य शासन, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा विभागीय आयुक्त.

१६. **अपिले व पुनरीक्षण अर्ज करण्याची कमाल मुदत.**—या नियमान्वये करावयाचे कोणतेही अपील किंवा पुनरीक्षणाचा अर्ज ज्या आदेशाच्या संबंधात ते अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करावयाचा असेल त्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास किंवा यथास्थिती अर्जदारास ज्या दिनांकाला मिळाली असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत करण्यात आला नाही, तर त्याचा विचार करण्यात येणार नाही:

परंतु, असे अपील किंवा पुनरीक्षणाचा अर्ज वेळेच्या आत सादर न करण्याकरिता अपीलकर्त्यास किंवा अर्जदारास पुरेसे कारण होते. त्याबद्दल अपील प्राधिकरणाची किंवा पुनरीक्षण प्राधिकरणाची खात्री होईल. त्याबाबतीत त्यास ते अपील किंवा यथास्थिती तो अर्ज विचारात घेता येईल.

१७. **अपील व पुनरीक्षण अर्जाचा नमुना व आशय.**—(१) अपील किंवा पुनरीक्षणाकरिता अर्ज करणारा प्रत्येक परिषद कर्मचारी स्वतंत्रपणे व स्वतःच्या नावाने असे अपील किंवा अर्ज करील.

(२) प्रत्येक अपील व पुनरीक्षणाचा अर्ज ज्या प्राधिकाऱ्याकडे करण्यात यावयाचा असेल त्याला उद्देशून लिहिण्यात येईल,

अपीलकर्ता किंवा अर्जदार यांची ज्यावर भिस्त असेल ती सर्व महत्त्वाची निवेदने व युक्तिवाद यांचा त्यात समावेश असेल व त्यामध्ये कोणतेही अपमानास्पद किंवा अयोग्य भाषा असणार नाही व तो परिपूर्ण असेल.

१८. **अपील व पुनरीक्षण अर्ज सादर करणे.**—प्रत्येक अपील व पुनरीक्षण अर्ज, तो ज्या प्राधिकरणाच्या आदेशाच्या बाबतीत केलेला असेल त्या प्राधिकरणामार्फत अपील प्राधिकारणाकडे किंवा पुनरीक्षण प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल :

परंतु, अपिलाची किंवा यथास्थिती, पुनरीक्षण अर्जाची एक प्रत अपील प्राधिकरणाकडे किंवा पुनरीक्षण प्राधिकरणाकडे थेट पाठविता येईल.

**१९. अपिले व पुनरीक्षण अर्ज रोखून धरणे.**---(१) ज्याच्या आदेशाच्या संबंधात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करण्यात आला असेल त्यात, ---

(एक) ज्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करता येत नसेल अशा आदेशाविरुद्ध ते अपील किंवा तो पुनरीक्षण अर्ज असेल; किंवा

(दोन) अशा अपिलात किंवा अर्जात नियम १७ च्या कोणत्याही तरतुदींचे पालन करण्यात आले नसेल; किंवा

(तीन) असे अपील किंवा अर्ज, नियम १८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत सादर करण्यात आला नसेल व विलंबाविषयी कोणतेही कारण दर्शविण्यात आले नसेल; किंवा

(चार) ज्या अपिलावर किंवा पुनरीक्षण अर्जावर अगोदरच निर्णय देण्यात आला आहे अशा अपिलाची किंवा पुनरीक्षण अर्जाची ती पुनरावृत्ती असेल व कोणीही नवीन वस्तुस्थिती किंवा परिस्थिती त्यात दर्शविण्यात आली नसेल, त्याबाबतीत, असे अपील किंवा यथास्थिती असा पुनरीक्षण अर्ज रोखता येईल;

परंतु, एखादे अपील किंवा पुनरीक्षण अर्ज, त्यामध्ये कलम १७ च्या तरतुदींचे पालन करण्यात आलेले नाही, याच केवळ कारणावरून रोखून धरण्यात आले असेल तर, ते अपील कर्त्याकडे किंवा अर्जदाराकडे परत पाठविण्यात येईल व तेव्हापासून उक्त तरतुदींचे अनुपालन करून एका महिन्याच्या आत ते पुन्हा सादर करण्यात आल्यास, ते रोखून धरण्यात येणार नाही.

(२) अपिल किंवा पुनरीक्षणाकरिता करण्यात आलेला अर्ज रोखून धरण्यात आला असेल त्याबाबतीत अपीलकर्त्यास किंवा अर्जदारास तसे करण्याबद्दलची वस्तुस्थिती व कारणे कळविण्यात येतील.

(३) प्रत्येक तिमाहीच्या सुरुवातीस कोणतेही प्राधिकरण त्याने पूर्वीच्या तिमाहीत रोखून धरलेल्या अपिलांची व पुनरीक्षण अर्जाची सूची ते रोखण्याच्या कारणांसह अपील प्राधिकरणासह किंवा यथास्थिती पुनरीक्षण प्राधिकरणास पाठवील.

**२०. अपिल व पुनरीक्षण अर्ज पाठविणे.**----(१) ज्या प्राधिकरणाच्या आदेशाच्या संबंधात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करण्यात आला असेल ते प्राधिकरण नियम १९ अन्वये जे अपील किंवा पुनरीक्षण अर्ज रोखून धरण्यात आला असेल असे प्रत्येक अपील किंवा पुनरीक्षण अर्ज व त्यावरील आपला शेरा व संबंधित कागदपत्र यांच्यासह टाळता येण्याजोगे कारण असल्याखेरीज विनाविलंब अपील प्राधिकरणाकडे किंवा यथास्थिती पुनरीक्षण प्राधिकरणाकडे पाठवील.

(२) ज्या प्राधिकरणाकडे अपील किंवा पुनरीक्षणाकरिता अर्ज करावयाचा असेल ते प्राधिकरण नियम १९ अन्वये रोखून धरण्यात आलेले कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण अर्ज आपल्याकडे पाठविण्यासंबंधी निदेश देऊ शकेल आणि, त्यानंतर असे अपील किंवा पुनरीक्षण अर्ज आणि ज्या प्राधिकरणाने असे अपील किंवा पुनरीक्षण अर्ज रोखून धरला असेल त्या प्राधिकरणाचा त्यावर शेरा व संबंधित अभिलेख त्या प्राधिकरणाकडे पाठविण्यात येतील.

**२१. अपिल व पुनरीक्षण अर्जांचा विचार.**-- (१) पदावरून निलंबित केल्याच्या आदेशाविरुद्ध करण्यात आलेल्या अपिलाच्याबाबतीत, अपील प्राधिकरण, नियम ३ च्या तरतुदींच्या अनुरोधाने आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, पदावरून निलंबित करण्याचा आदेश, समर्थनीय आहे किंवा कसे याविषयी विचार करील आणि त्यानुसार तो आदेश कायम करील किंवा रद्द करील.

(२) नियम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादणाऱ्या आदेशाविरुद्ध करण्यात आलेले अपील किंवा पुनरीक्षण अर्ज यांच्याबाबतीत अपील प्राधिकरण किंवा यथा-स्थिती पुनरीक्षण प्राधिकरण---

(अ) या नियमामध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन करण्यात आले आहे किंवा कसे आणि असे अनुपालन केलेले नसल्यास, त्यामुळे न्यायदान विफल झाले आहे किंवा कसे;

(ब) निष्कर्ष समर्थनीय आहेत किंवा कसे;

(क) लादण्यात आलेली शिक्षा जास्त आहे, पुरेशी आहे किंवा अपुरी आहे याबद्दल विचार करील; आणि

(एक) शिक्षा रद्द करणारे, कमी करणारे, कायम करणारे किंवा वाढविणारे; किंवा

(दोन) ज्या प्राधिकरणाने शिक्षा दिली त्या प्राधिकरणाकडे किंवा त्या प्रकरणाच्या बाबतीत त्यास योग्य वाटेल अशा निर्देशासह अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे असे प्रकरण पाठविणारे आदेश देईल. परंतु,—

(एक) अपील प्राधिकरण किंवा यथास्थिती, पुनरीक्षण प्राधिकरण, असे प्राधिकरण किंवा ज्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे असा आदेश किंवा पुनरीक्षणाकरिता विचाराधीन असलेल्या आदेश ज्याने दिला असेल असे प्राधिकरण जी शिक्षा देण्यास सक्षम नसेल अशी कोणतीही वाढीव शिक्षा देणार नाही;

(दोन) ज्या वाढीव शिक्षेमुळे ज्या परिषद कर्मचाऱ्यास बाधा पोहोचणार असेल, त्यास अशा वाढीव शिक्षेविरुद्ध जे कोणतेही अभिवेदन करावयाचे असेल असे अभिवेदन करण्याची संधी त्यास दिल्याखेरीज अशी वाढीव शिक्षा देणारा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही; आणि

(तीन) अपील प्राधिकरणाने किंवा यथास्थिती पुनरीक्षण प्राधिकरणाने देण्याचे योजिलेली वाढीव शिक्षा ही नियम ४ च्या खंड (४) ते (७) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी एक असेल, आणि त्या प्रकरणी नियम ६ अन्वये चौकशी करण्यात आली नसेल त्याबाबतीत नियम ९ च्या तरतुदीस अधीन राहून असे प्राधिकरण स्वतः अशी चौकशी करील किंवा चौकशी करण्यात यावी असा निदेश देईल आणि त्यानंतर अशा चौकशीची कार्यवाही विचारात घेतल्यावर व संबंधित परिषद कर्मचाऱ्यास अशा शिक्षेविरुद्ध कोणतेही अभिवेदन करावयाचे असल्यास ते अभिवेदन करण्याची त्यास संधी दिल्यानंतर त्यास योग्य वाटतील, असे आदेश देईल.

(३) नियम १४ मध्ये किंवा नियम १५ च्या पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलाच्या किंवा पुनरीक्षण अर्जाच्या बाबतीत अपील प्राधिकरण किंवा यथास्थिती पुनरीक्षण प्राधिकरण त्या प्रकरणाची सर्व परिस्थितीचा विचार करील आणि त्यास न्याय व रास्त करतील असे आदेश देईल.

२२. **अपील व पुनरीक्षणावरील आदेशाची अंमलबजावणी**.—अपील प्राधिकरण किंवा पुनरीक्षण प्राधिकरण ज्या प्राधिकरणाच्या आदेशासंबंधातील अपिलावर किंवा पुनरीक्षण अर्जावर आदेश देईल ते प्राधिकरण अपील प्राधिकरणाने किंवा पुनरीक्षण प्राधिकरणाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करील.

२३. **शिस्तविषयक प्राधिकरण हेच नंतर अपील प्राधिकरण किंवा पुनरीक्षण प्राधिकरण होईल याबाबतीत तरतूद**.—या भागात काहीही अंतर्भूत असले तरी ज्या व्यक्तीने दिलेला आदेश अपिलात किंवा पुनरीक्षणात विचाराधीन असेल ती व्यक्ती नंतर तिची नियुक्ती झाल्यामुळे किंवा अन्यथा अशा आदेशाच्या संबंधात नियम १२ ते १४ अन्वये अपील प्राधिकरण किंवा पुनरीक्षण प्राधिकरण होईल तर, ती व्यक्ती ती ज्या प्राधिकरणास निकटतम दुय्यम असेल, त्या प्राधिकरणाकडे ते अपील किंवा तो पुनरीक्षण अर्ज पाठवील आणि असे प्राधिकरण हे त्या अपिलाच्या किंवा पुनरीक्षण अर्जाच्या बाबतीत, नियम १२ ते १४ च्या प्रयोजनार्थ अपील प्राधिकरण किंवा पुनरीक्षण प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.

## भाग पाच [1][पुनर्विलोकन]

२४ **पुनर्विलोकन**.—नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादणाऱ्या आदेशाविरुद्धचे अपील ज्याच्याकडे करण्यात आले असेल असे मुख्य कार्यकारी अधिकारी, (अतिरिक्त) विभाग आयुक्त किंवा राज्य शासन स्वतःच केलेल्या प्रस्तावावरून किंवा अन्यथा,

---

[1] पहा शासकीय अधिसूचना क्रमांक डीईएनस-१०८२/७९७/(२३२५)/७२/आठ-ब, दिनांक २० एप्रिल १९८३.

कोणत्याही शिस्तभंगविषयक कार्यवाहीत त्या प्रकरणांच्या अभिलेखांची मागणी करू शकेल. अशा एखाद्या प्रकरणात देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करू शकेल किंवा जणू काही परिषद कर्मचाऱ्याने अशा आदेशाविरुद्ध अपील दाखल केले असल्याप्रमाणे त्यास योग्य वाटतील असे आदेश या प्रकरणी देऊ शकेल.

परंतु,—

(एक) शिक्षा लादणारा किंवा वाढविणाऱ्या आदेशाविरुद्ध संबंधित परिषद कर्मचाऱ्याला कोणतेही अभिवेदन करण्याची इच्छा असल्यास, त्यास तशी संधी देण्यात आल्याखेरीज अशा शिक्षा लादणारा किंवा वाढविणारा आदेश देण्यात येणार नाही.

(दोन) नियम ६ अन्वये चौकशी करण्यात आली नसेल अशा प्रकरणी नियम ४ च्या खंड (४) ते (७) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादण्याचे पुनरीक्षण प्राधिकरण ठरवील त्याबाबतीत नियम ९ च्या तरतुदीस अधीन राहून ते अशी चौकशी करण्यात यावी असा निदेश देईल. आणि त्यानंतर अशा चौकशीची कार्यवाही विचारात घेतल्या-वर व संबंधित परिषद कर्मचाऱ्यास अशा शिक्षेविरुद्ध कोणतेही अभिवेदन करण्याची इच्छा असल्यास, त्यास तशी संधी दिल्यानंतर त्यास योग्य वाटतील असे आदेश देईल.

## भाग सहा—संकीर्ण

२५. **निरसन व व्याप्ती.**—(१) या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी जे कोणतेही तत्सम नियम अंमलात असतील ते नियम, ज्या व्यक्तींना हे नियम लागू होत असतील त्या व्यक्तींच्या बाबतीत, याद्वारे निरसित करण्यात येत आहेत:

परंतु,—

(अ) अशा निरसनामुळे त्या नियमांच्या पूर्वी झालेल्या अंमलबजावणीस किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीस किंवा कार्यवाहीस बाध येणार नाही;

(ब) अशाप्रकारे निरसित करण्यात आलेल्या नियमान्वये केलेली अपीले व पुनरीक्षणे या-सुद्धा कोणतीही कार्यवाही या नियमांच्या प्रारंभाच्या तारखेस प्रलंबित असेल त्याबाबतीत ती या नियमांच्या तरतुदीनुसार पुढे चालविण्यात येईल व निर्णय करण्यात येईल.

(२) या नियमांच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेल्या एखाद्या आदेशाविरुद्ध या नियमांच्या प्रारंभा-नंतर दाखल करण्यात आलेले अपील किंवा पुनरीक्षण अर्ज याचा या नियमांच्या तरतुदीनुसार निर्णय करण्यात येईल.

२६. **शंका दूर करणे.**—(एक) कोणतेही प्राधिकरण, दुसऱ्या कोणत्याही प्राधिकरणाहून दुय्यम दर्जाचे किंवा उच्च दर्जाचे आहे याबाबत; किंवा

(दोन) नियम २५, पोट-नियम (१) च्या परंतुकान्वये चालू असलेले कामकाज किंवा त्या नियमाच्या पोट-नियम (२) अन्वये दाखल करण्यात आलेले कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण अर्ज यांवर विचार करण्यास कोणते प्राधिकरण सक्षम आहे;

किंवा

(तीन) या नियमांच्या कोणत्याही तरतुदीचा अर्थ लावण्याबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, ती बाब राज्य शासनाकडे निर्देशित करील व राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई